INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 8 | SEPTEMBER – 2025

# महाराष्ट्र राज्याच्या जल क्षेत्रातील कायद्यात्मक व धोरणात्मक सुधारणांचा आढावा

**डॉ. निलेश चंदकांत आढाव**
सहयोगी प्राध्यापक, एम. एस काकडे महाविद्यालय सोमेश्वर नगर बारामती.

**आशिष भद्रे**
संशोधक विद्यार्थी , संशोधन केंद्र एस एस आर्ट्स ,
डी जे मालपाणी कॉमर्स आणि बी एन सारडा स्वायत्त कॉलेज संगमनेर.

**गोषवारा .**



आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक स्तरावर जलक्षेत्रात व्यापक असे बदल दीर्घकाळापासून घडत आलेले आहेत मग हे बदल कायद्यात्मक व धोरणात्मक, संस्थात्मक व संरचनात्मक स्वरूपांचे आहेत या बदलांमाघे जलक्षेत्रात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या धोरणांचा प्रभाव प्रामुख्याने कारणीभूत ठरला भारतातील जलक्षेत्रात कायद्यात्मक ब संस्थात्मक बदल जे घडले आहेत त्यामध्ये राष्ट्रीय जलनीती चा समावेश हा एक प्रमुख बदल होता त्याच धर्तीवर भारतातील वेगवेगळ्या राज्यांनी जल क्षेत्रात राज्य जलनीती जाहीर केली याच पद्धतीने महाराष्ट्र राज्यानेही जलक्षेत्रात व्यापक अशा कायद्यात्मक आणि धोरणात्मक सुधारणा व बदलांची प्रक्रिया राबवली आहे त्याच प्रक्रियेचा सविस्तर आढावा या संशोधन लेखात घेतला आहे .

## प्रस्तावना

जल क्षेत्रातील सुधारणात्मक तत्त्वांचे अनुकरण राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगवेगळ्या दिशांनी झाले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर, नवी दिल्ली आणि डब्लिन परिषदेने नमूद केलेली तत्त्वे गेल्या दोन दशकांमध्ये अनेकदा पुन्हा अधोरेखित करण्यात आली आहेत. मात्र, या तत्त्वांना समाविष्ट करणारा एकही नवीन आंतरराष्ट्रीय जल कायदा व करार अस्तित्वात आलेला नाही ( युनायटेड नेशन १९९०). गेल्या दोन दशकांतील जल क्षेत्रातील घडामोडींकडे पाहिल्यास वेगवेगळ्या प्रकारच्या साधनांमधील पारंपरिक भेदरेषा धूसर झाल्या आहेत. हा बदल कायदा तयार होण्याच्या प्रक्रियेतील नैसर्गिक प्रगतीचा एक भाग असू शकतो, परंतु हे चिंताजनक आहे कारण जल शासनात लोकशाही आणि सार्वजनिक यंत्रणांना वगळून पारदर्शकतेअभावी आणि सार्वजनिक सहभाग टाळणाऱ्या रचनांची निवड केली जात आहे. गेल्या वीस

वर्षांतील घडामोडींमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये कायदेशीर चौकट तुलनेत कमी विकसित झालेली असून धोरणात्मक चौकट अधिक विकसित झालेली आहे. माघील दोन दशकांमध्ये आंतरराष्ट्रीय जलधोरणामध्ये

मोठा बदल घडून आला आहे. या बदलांची पहिली मोठी खूण 1990 मध्ये जागतिक सल्लामसलत परिषदेमध्ये स्वीकारलेल्या नवी दिल्ली स्टेटमेंट मध्ये दिसते (युनायटेड नेशन्स 1990) या विधानात पाण्याच्या एकात्मिक व्यवस्थापनाची शिफारस करण्यात आली होती, तसेच शासनाने पुरवठादाराऐवजी सहाय्यकाची भूमिका निभावावी, ग्राहकांच्या गरजांप्रती उत्तरदायी असावे आणि खर्चसापेक्ष कार्यप्रणाली अंगीकारावी, असे सूचित करण्यात आले होते आणि विशेषतः या विधानात "स्वच्छ पाणी हे विनामूल्य वस्तू नसून त्याचे मूल्य मान्य केले जावे" यावर भर देण्यात आला होता.

हे सुरुवातीचे तत्त्व पुढे डब्लिन स्टेटमेंट (1992) मध्ये अधिक दृढ करण्यात आले ज्यात स्पष्टपणे असे म्हटले होते की "पाणी ही एक आर्थिक वस्तू आहे" हे बदल जलधोरणातील सर्वांत मोठे परिवर्तन मानले जाते. पाणी ही मर्यादित व जीवन आवश्यक वस्तू आहे, हे मान्य केल्यामुळे पाणी वापराची कार्यक्षमता वाढविणे व मागणी व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक ठरले. याचाच भाग म्हणून पाणीसेवांसाठी दर आकारणीची मागणीही पुढे आली. याच वेळी, पाणी क्षेत्राच्या सर्व कामकाजासाठी पूर्ण खर्च वसुलीकरणाचे तत्व स्वीकारण्यात आले ( वोरोस्मार्टी 2005) याच्या मते जलनियमन हा एक वेगळा विषय आहे, जो आंतरराष्ट्रीय कायदेशीर चौकटीत थोड्याफार प्रमाणात समाविष्ट आहे . ( युनायटेड नेशन १९९० राष्ट्रीय स्तरावर, भारताच्या संदर्भात दोन मूलभूत संरचनात्मक समस्या समोर आल्या आहेत. पहिली म्हणजे, काही जलकायदे हे जल क्षेत्र सुधारणा तत्त्वांनी प्रेरित असून ते भारतातील विद्यमान कायदेशीर व्यवस्थेच्या तुलनेत या सुधारणांच्या प्राधान्यक्रमांवर अधिक लक्ष केंद्रित करतात. दुसरी बाब म्हणजे, 1990 च्या दशकाच्या उत्तरार्धात जागतिक बँकेने सुचवलेली ‘जलधोरणे’ स्वीकारण्याची प्रक्रिया ही एक आत्मकेंद्रित कृती ठरली असून ती व्यापक कायदामंडळ प्रक्रियेचा भाग म्हणून आखली गेलेली नव्हती (जागतिक बँक 1998). दुसरे म्हणजे, केंद्र आणि अनेक राज्यांनी जलधोरणे स्वीकारली आहेत. पहिले राष्ट्रीय जलधोरण 1987 मध्ये अस्तित्वात आले आणि त्यानंतर 2002 मध्ये त्याचा आढावा घेऊन सुधारणा करण्यात आली (भारत सरकार 1987; 2002). ते 2012 मध्ये पुन्हा एकदा सुधारित केले जाणार होते. राज्य पातळीवर, राज्य जलधोरणांची अंमलबजावणी 1990 च्या दशकाच्या उत्तरार्धात सुरू झाली. आज अनेक राज्यांनी आपापली जलधोरणे तयार केली आहेत किंवा तयार करण्याच्या प्रक्रियेत आहेत (केरळ सरकार 2008; उत्तर प्रदेश सरकार 1999).

या जलधोरणांना तत्त्वतः व्यापक जलकायद्याच्या दिशेने एक प्रारंभिक पाऊल मानले जाते. मात्र, या धोरणांमध्ये जलवापर प्राधान्यक्रमासारख्या संपूर्ण जल क्षेत्रावर परिणाम करणाऱ्या सर्वसाधारण तत्त्वांची मांडणी असली तरीही, या धोरणांचा वापर पुढे बंधनकारक कायदेशीर साधनांच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी झाला नाही, केंद्र सरकारकडून वारंवार नवीन जलधोरण स्वीकारले जाणे हे त्या कारणामुळे स्पष्ट होऊ शकते की, संविधानानुसार केंद्र सरकारला जलसंबंधी कायदे करण्याचा विशिष्ट अधिकार नाही. मात्र राज्य सरकारांच्या बाबतीत, अशा धोरणांचा कायदेशीर चौकटीशी काही संबंध न ठेवता केवळ ‘विकसनशील दस्तऐवज’ म्हणून विचार केला गेला, हे समजण्याजोगे नाही.

तिसरे म्हणजे, केंद्र सरकारने जलक्षेत्रात हस्तक्षेप करण्यासाठी प्रशासकीय निर्देशांचा वापर बऱ्याच काळापासून केला आहे. काही बाबतीत, जसे की ग्रामीण पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात, केंद्र सरकारच्या हस्तक्षेपाने खूप मोठा प्रभाव निर्माण झाला आहे, जरी ते कोणत्याही कायदेशीर अधिनियमाच्या स्वरूपात नव्हते (भारत सरकार 2010, ).

हे अंशतः यामुळे झाले की केंद्र सरकारने आपली आर्थिक ताकद वापरून राज्यांना आपले धोरणात्मक चौकट स्वीकारण्यास भाग पाडले. परिणामी, जरी केंद्राला राज्यांमधील ग्रामीण पिण्याच्या पाण्यात थेट हस्तक्षेप करण्याचा कायदेशीर अधिकार नसेल, तरीही केंद्राची धोरणात्मक चौकट संपूर्ण देशभरात स्वीकारली गेली आहे. आणि केंद्राच्या धोरणांमध्ये बदल

झाला की, राज्य ही तो बदल लवकर स्वीकारतात, जसे की अकराव्या पंचवार्षिक योजनेसाठी नवीन धोरणात्मक चौकट स्वीकारण्यात आली (भारत सरकार 2010).

मात्र, हे बदल वरवर पाहता किरकोळ वाटले तरी, ते जल क्षेत्रात कायद्याच्या स्थानाचे पुनर्विचार करण्याचे अधिक खोल प्रयत्न दर्शवतात. मूलभूत संकल्पना अशी आहे की धोरण हे तत्त्वे, घटक आणि प्रक्रिया ठरवते. नंतर त्यांना कायद्यातून बंधनकारक निर्णयप्रणालीत रूपांतरित करता येते ( लझं अँड स्टिन 2009: ). दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले, तर नव्या आकलनात धोरण हे व्यापक चौकट ठरवते आणि कायदा ही त्या चौकटीची रचनात्मक अंमलबजावणी करणारी यंत्रणा असते उदाहरणार्थ, अंमलबजावणीयोग्य हक्कांद्वारे.या चौकटीत, 'कायदे हे धोरणांपासून वेगळे असले तरी पूरक असतात ते कायदेशीर स्पष्टता निर्माण करतात आणि त्यामुळे कायद्याचे पालन आणि अंमलबजावणी सुलभ होते' (लझ अँड स्टिंन 2009:). चालू सुधारणा प्रक्रियेमध्ये कायद्याला अशा यंत्रणेसारखे मानले जाते जे आधीच ठरवलेल्या धोरणात्मक चौकटीची अंमलबजावणी करते. हे पारंपरिक समजुतीच्या उलट आहे, जिथे कायदा ही अशी यंत्रणा आहे जी विधीमंडळाकडून जल क्षेत्रासाठी मूलभूत चौकट तयार करते आणि कार्यकारी यंत्रणा नियम उपनियमांद्वारे त्याचे तपशील निश्चित करते. या लेखांमध्ये आम्ही महाराष्ट्र राज्यातील जल क्षेत्रात जी कायद्यात्मक व धोरणात्मक बदलांची प्रकिया राबवली गेली आहे आशा कायद्यात्मक व धोरणात्मक प्रक्रियांचा आढावा या संशोधन लेखांमधून घेतला आहे.

## महाराष्ट्र राज्यातील जलक्षेत्रात कायद्यात्मक बदल -

महाराष्ट्र राज्यातील जलक्षेत्रात कायद्यात्मक आणि संस्थात्मक सुधारणांचा इतिहास 1960 पासून सुरू होतो जेव्हा महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय अधिनियम 19 60 अमलात आणण्यात आले त्यानंतर 1970 चा दुष्काळात काही महत्वपूर्ण कायदे लागू करण्यात आले जसे की पाणी प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण अधिनियम 1974 महाराष्ट्र सिंचन अधिनियम 1976 महाराष्ट्र खरलंड सुधारणा अधिनियम 1979 ,1972 मध्ये राज्य सरकारने भूगर्भ जल सर्वेक्षण विकास संस्था स्थापन केली विशेषत भूगर्भजलावर आधारित लघु सिंचन योजनांच्या विकासासाठी कायद्यात्मक चौकट आखण्यात आली या सर्व कायद्यांचा उद्देश जलसंपत्तीचे शिस्तबद्ध आणि कार्यक्षम व्यवस्थापन करणे आणि विविध वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तिचा योग्य वापर निश्चित करणे हा होता पण 1980 च्या दशकात दीर्घकाळ शांतता राहिल्यानंतर 1990 च्या दशकात राज्यात जल व्यवस्थापन क्षेत्रात धोरणात्मक व नियामक सुधारणांची नवी लाट आली या सुधारणा पूर्वीच्या संस्थात्मक आणि प्रशासनिक व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल करणाऱ्या ठरल्या सुधारणांमध्ये विशेषत पिण्याच्या पाण्यासाठी व भूगर्भ जल नियमानासाठी महाराष्ट्र भूजल अधिनियम 19 95 व पाच प्रमुख नदी खोरे सिंचन विकास महामंडळे स्थापन करण्यासाठी वेगवेगळे कायदे करण्यात आले यामध्ये कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम 19 96 विदर्भ सिंचन विकास महामंडळ अधिनियम 19 97 तापी सिंचन विकास महामंडळ अधिनियम 19 97 कोकण सिंचन विकास महामंडळ अधिनियम 1997 गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ अधिनियम 1998 या सिंचन विकास महामंडळाची स्थापना म्हणजे राज्यातील पारंपारिक आदेश व नियंत्रण प्रकार खंडित करून जल व्यवस्थापनाच्या खाजगीकरणाकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल होते गेल्या दशकात राज्यातील जलक्षेत्रात आणखी अमुलाग्र सुधारणा झालेल्या आहेत या सुधारणा कायद्यात्मक व धोरणात्मक स्वरूपांच्या आहेत महाराष्ट्र राज्यातील जलक्षेत्रात ज्या कायद्यात्मक व धोरणात्मक सुधारणा झालेल्या आहेत व या सुधारात्मक बदलांमुळे राज्याच्या जलक्षेत्राचे स्वरूप बदललेले आहे

महाराष्ट्र राज्याने 1976 साली महाराष्ट्र सिंचन कायदा संमत केला या कायद्यानुसार राज्य सरकार जिल्हा परिषद किंवा सरकारी कंपनी यांच्याकडे महाराष्ट्रातील सिंचनाचे व्यवस्थापन असणे बंधनकारक आहे या कायद्यामध्ये खाजगी क्षेत्राची गुंतवणूक व लोकांचा सहभाग यावर अर्थातच भाष्य नाही कोणतेही नदी ओढा सरोवर व नैसर्गिक साठ्यांचे पाणी याचा वापर करण्यासाठी करार करायचा असेल तर त्यासाठी शासनाने अधिसूचना काढणे आवश्यक आहे

कायद्याच्या पातळीवरील पुढचे महत्त्वाचे पाऊल म्हणजे 1993 महाराष्ट्र शासनाने संमत केलेला महाराष्ट्र भूजल पिण्याच्या पाण्याचे विनिमयन अधिनियम होय पिण्याच्या पाण्याचे सार्वजनिक स्त्रोत सुरक्षित रहावेत म्हणून भूजलाच्या उपशयावर काही प्रमाणात नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने हा कायदा तयार करण्यात आला त्यानुसार एकाच पाणलोट क्षेत्रामध्ये पिण्याचा पाण्याचा सार्वजनिक स्त्रोतापासून पाच मीटरचा आत खाजगी विहीर खोदण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक आहे तसेच एखाद्या पाणलोट क्षेत्राला अति विकसित पाणलोट क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा अधिकार शासनाला आहे अशा क्षेत्रात शासनाच्या परवानगीशिवाय विहीर खोदण्याची परवानगी कोणालाही नाही पाणीटंचाई मुक्त क्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याच्या व्यतिरिक्त विहिरीतून होणारा उपसा शासन नियंत्रित करेल टंचाईमुक्त क्षेत्रात भूजल वापरावर निर्बंध घालण्याचे अधिकार शासनाला या कायद्याने प्राप्त झालेले आहेत भूजलासारख्या महत्त्वाच्या पाण्याच्या स्त्रोतावर नियंत्रण मिळवण्याचा राज्य सरकारचा मर्यादित स्वरूपाचा प्रयत्न आहे या कायद्याने कायद्याचे वर्णन करता येईल कायदा संमत झाल्यापासून गेल्या १३ वर्षात या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झालेले नाही (पुरंदरे 2021)

विशेष करून 1990 नंतर राज्याच्या जलक्षेत्राचे धोरणात्मक स्वरूप बदलण्यात विशेष प्रयत्न झाले यामध्ये आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय व राज्य पातळीवरती प्रयत्न झालेले आहेत त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा प्रमुख बदल म्हणजे केंद्र सरकारच्या धरतीवर महाराष्ट्र राज्याने राज्याच्या जल क्षेत्राचे धोरणात्मक नियोजन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य जलनीती 2003 ची मांडणी केली

### धोरणात्मक बदलांची प्रक्रिया -

राज्याच्या जल क्षेत्रात सुरवातील जे बदल झाले ते कायद्यात्मक स्वरूपांचे होते पण 2000 नंतर जल क्षेत्रात नवीन धोरणात्मक सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला या पुढाकारा मागे आंतरराष्ट्रीय संस्थाचा दबाव ही कारणीभूत होता

### राज्य जलनीती 2003 -

महाराष्ट्रात जुलै 2003 साली राज्य जलतीची अधिकृतरित्या स्वीकारली जलक्षेत्रात पुनर्रचना व सुधारणा करण्यासाठी जल क्षेत्राचे संस्थात्मक व कायदात्मक स्वरूप बदलण्यामागे या जलनीतीची भूमिका खूप महत्त्वपूर्ण आहे या जलनीतीने एक पंचसूत्री समोर ठेवली आहे (१) जलसंपत्तीचे उत्तम रीतीने व अधिक समन्यायी पद्धतीने आणि उत्पादन क्षमतेने व्यवस्थापन करण्यासाठी पर्यावरणीय दृष्ट्या शाश्वत अशा उत्पादन वाढीस चालना देणारा दारिद्र्य निर्मूलन करणारा प्रादेशिक असंतुल कमी करणारा आणि सुयोग्य वातावरण निर्माण करणारा एक नवीन जलनीतीचा आराखडा राज्य अवलंबेल (२) शासन संस्थांनी पाणी वापरणारे यांच्या भूमिकेची पुनर्रचना करणे (३) जलक्षेत्रातील सध्याची संस्थात्मक रचना बदलून नवीन संसारात्मक निर्मिती करणे आणि कारभाराचे विकेंद्रीकरण करणे (४) कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा विकास आणि प्रसार यावर भर देणे आणि (५) या सर्व गोष्टी प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक ते कायदे करणे या गोष्टींचा समावेश आहे .

या जलनीतीने जल क्षेत्रासाठी धोरणात्मक उपाययोजना करण्यासाठी अनेक उद्दिष्ट ठेवलेले आहेत यातील प्रमुख उद्दिष्टांपैकी एकात्मिक बहुक्षेत्रीय व नदी खोरे विषयक दृष्टिकोन राज्य जल नियोजन आराखडा जलनीतीचे नियोजन विकास व व्यवस्थापन यामधील पाणी वापरणाऱ्यांचा सहभाग, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व यासाठी सामूहिक व्यवस्थापन खाजगी क्षेत्राचा सहभाग, पाण्याची गुणवत्ता माहिती व सनियंत्रण पद्धती ,जिल्हा परिषद जलसंधारण आवर्षण व्यवस्थापन असे दीर्घकालीन साध्य करण्यासाठी उद्दिष्टे ठेवलेले आहेत जिल्ह्यातील अनेक आशा घटकांचा समावेश केलेला आहे जे घटक जलनीतीचे स्वरूप बदलण्यामध्ये महत्त्वाचे ठरतात या बदलांमुळे जल क्षेत्रा मध्ये अमुलाग्र असे बदल दिसून येतात जल नीतीतील प्रमुख मुद्द्यांपैकी एक म्हणजे पाणी वापराचा प्राधान्यक्रम या जलनीतीत पहिल्यांदाच जल क्षेत्रामध्ये पाणी वापराचे प्राधान्यक्रम तयार केले आहेत आणि या प्राधान्यक्रमा अंतर्गत पशुधन पिण्यासाठी पाणी तसेच शेतकरी आरोग्य आणि स्वच्छता विषय गरजांसाठी घरगुती वापर यासाठी पहिला प्राधान्यक्रम देण्यात आला औद्योगिक वाणिज्य वापर व कृषी उत्पादनावर आधारित उद्योगासाठी वापरासाठी दुसरा प्राधान्यक्रम देण्यात आला कृषी व जलविद्युत क्षेत्रासाठी तिसरा प्राधान्य क्रम देण्यात आला पर्यावरण व करणुकीच्या साधनांसाठी वापर आणि यानंतर इतर सर्व प्रकारच्या वापरासाठी पाणी वापरायचे अधिकार देण्यात आलेले आहेत या जलनीती मध्ये कृषी क्षेत्रासाठी तिसरा व उद्योगासाठी दुसरा असा प्राधान्यक्रम देण्यात आला होता पण त्यानंतर अनेक नागरी समाज व संघटनांनी केलेल्या दीर्घ चर्चा नंतर पाण्याचे प्राधान्यक्रम बदलण्यात आले व कृषी क्षेत्रासाठी दुसरा व उद्योगासाठी तिसरा असे प्राधान्यक्रम 2011 मध्ये जलनीतीत सुधारणा करण्यात आली या जलनीती मध्ये पाणी वापराचे हक्क देण्यात आलेले आहेत पाणी वापराच्या हक्कांमध्ये पाण्याचा ठोक हक्काचा सातत्याने वापर करण्याचा व पाणी वापर यंत्रणा व सेवा पुरवठादार यांना बरेच आर्थिक व सामाजिक महत्व आहे पाण्याच्या हक्कासाठी राज्य एक सुनिश्चित अशा पारदर्शक व्यवस्थेची स्थापना करेल की ज्या व्यवस्थेमध्ये राज्याचे कोणतेही अभिकरण किंवा प्राधिकरण एकतर्फी बदल करू शकणार नाही घनमापन पद्धतीने पाणीपुरवठा व पाण्याचे शुल्क आकारणी या अंतर्गत शासनाने पाण्याला व्यापारी मूल्य बनवलेले आहे त्यामुळे पाण्याचा व्यापार करणे अधिकरिकरित्या शक्य झालेले आहे तसेच शासन वेगवेगळ्या घटकांना पाणीपुरवठा करतो त्यावरती शुल्क आकारण्याचा अधिकार शासनाने या जलनीती अंतर्गत प्राधिकरणाला दिलेला आहे

भूजल व्यवस्थापन पुनर्वसन पुनर्स्थापन या अंतर्गत शासन भूपुष्टिय आणि भूजल स्तरावरचे पाण्याचे नियोजन करेल व भूगर्भ व्यवस्थापन व पुराणमुळे नुकसान झालेल्या लोकांना पुनर्वसन व पुनर स्थापन करण्याचे काम करेल जल क्षेत्राचे चित्र बदलण्यामध्ये व जलक्षेत्रात ज्या प्रमुख घडामोडी घडलेल्या आहेत त्यामध्ये राज्य जलनितीची भूमिका नेहमी निर्णायक राहिली आहे कारण राज्य जलनीतीने जे उद्दिष्ट ठेवलेले आहेत व पाण्याची नियोजन करण्यासाठी ज्या मुद्द्यांची मांडणी केलेली आहे त्या आधारे जलक्षेत्रात व्यापक स्वरूपाचे बदल घडून येत आहेत त्यामुळे जल क्षेत्रात खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण करण्याचा मोठ्या प्रमाणात वाव तयार झाला आहे अनेक धरणांचे खाजगीकरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे जल क्षेत्रात खाजगी कंपन्यांना प्रोत्साहन दिले जात आहे या जलनीतीत जे तत्वे मांडण्यात आली होती त्या तत्वांची अंमलबजावणी ची प्रक्रिया खूप संत गतीने चालू आहे

राज्य जलनीती 2019 केंद्र सरकारने पहिले जल धोरण 1987 दुसरे जल धरून 2002 व तिसरे जल धोरण 2012 मध्ये लागू केले व अशी शिफारस केली की राज्यांनी त्यांच्या जलनीतीत पुनर्रचना केली पाहिजे व याचेच अनुकरण करत महाराष्ट्र राज्याने 2019 साली दुसरी जलनीती जाहीर केली या जलनीती मध्ये 2003 साली जे जलनीतीत उद्दिष्ट ठेवलेले होते

व जलनीती अंतर्गत जे कायदे करण्यात आलेले आहेत त्याची प्रक्रिया कशा पद्धतीने पार पडत आहे त्याची मांडणी सुरुवातीला केलेली आहे यामध्ये महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्याकडून व्यवस्थापन अधिनियम 2005 आणि त्या खालील नियम याद्वारे पाणी वापर संस्थांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत सप्टेंबर 2017 पर्यंत 4329 इतक्या पाणी वापर संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत राज्यातील जलसंपत्तीचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम 2005 कलम तीन अन्वये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे राज्यातील भूजलाचा शाश्वत कायमस्वरूपी समन्वयी पाणीपुरवठा करण्यासाठी व नियमन करणे व त्याचे सुलभिकीकरण यासाठी भूजल विकास व व्यवस्थापन अधिनियम 2009 अधिनियम लागू करण्यात आले व अधिनियमित करण्यात आले असून ते राज्याच्या भूजल संपत्तीचे विनियमन करण्यासाठी देखील महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास अधिकार प्राप्त झालेले आहेत 2019 च्या जलनीती मध्ये काही प्रमुख उद्दिष्टे ठेवण्यात आलेले आहेत राज्यात शुद्ध जल व स्वच्छ पाणी सुनिश्चित करणे.

पाणीटंचाई व आवर्षणास सामोरे जाण्यासाठी आवश्यक स्तरिकरण करणे

विविध पाणी वापर घटकांमध्ये जागतिक व धोरणी पद्धतीचे पाण्याचे क्षेत्रीय वाटप करणे पाण्याचे समन्यायी वाटप करून वाटप केलेल्या पाण्याची हमी देणे

परिसंस्थेचे संरक्षण करणे पाण्याच्या वापराचे उत्पादकता व कार्यक्षमता यात वाढ करणे सुयोग्य सुधारणा सह जलसंपत्ती विकासाकडून एकात्मिक जलसंपत्ती व्यवस्थापनाकडे पद्धतशीरपणे संक्रमण करणे जलनीतीच्या केंद्रस्थानी असलेले विषय जल व्यवस्थापनामध्ये लाभधारकांच्या सहभागाची सुनिश्चिती व धोरणात्मक नियोजन गुंतवणुकीबाबत प्राधान्य ठरविणे.

## धोरणाचे निरंतर सनियंत्रण करणे

सार्वजनिक वापर क्षेत्र व पाणी वापराच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे वापर योग्य पाण्याचे प्रमाण पारदर्शी व सुनिश्चित प्रक्रियेद्वारे सुशासन आणून समानता सामाजिक न्याय आणि स्थिरता ही उद्दिष्टे साध्य करणे परिकल्पित धोरणे लाभधारकांचा सहभाग. धोरणात्मक बदलांच्या निर्णय प्रक्रियेत पाणी वापरकर्ते धोरणकर्ते जल क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती अशासकीय संघटना त्यांच्या मोठ्या प्रमाणावर सहभागाची सुनिश्चिती करण्यात येईल क्षेत्रीय वाटप घरगुती कृषी उद्योग परिसंस्था व विभिन्न पाणी वापर यामध्ये पाण्याचे वाटप करणे हे शासन जल व्यवस्थापन व्यवस्थापनातील एक परिणामकारक धोरणी उद्दिष्ट आहे.

या जलनीतीत पाण्याच्या वापराच्या प्राधान्यक्रमाची पुनर्रचना करण्यात आलेली आहे यामध्ये घरगुती गरजा त्यानंतर कृषीआधारित उद्योग त्यानंतर औद्योगिक विद्युत निर्मिती जलविद्युत निर्मिती परिस्थितितीकीय संस्कृती व धार्मिक समारंभ करमणूक व क्रीडा असे प्राधान्यक्रम ठरवले आहेत.

नदी खोरे प्राधिकरण सक्षम प्राधिकारी ठरवेल असा प्रकल्पनियित वाटपाच्या मर्यादित विविध वापर करताना ठोक पाणी हकदारी वितरित करेल.

पाणीटंचाईच्या वर्षात विविध वापरासाठी पाणी वाटपांचे निकष तुटीच्या विभागणीची टक्केवारी लाभार्थ्यांची हितसंबंधीची मते विचारात घेऊन नियमन प्राधिकरणाद्वारे निर्धारित करण्यात येतील एकात्मिक राज्य जल आराखडा अंतर्गत राज्याच्या जलसंपत्तीचे भूपृष्ठ व भूजल समतोल शाश्वत विकास व व्यवस्थापन करण्यासाठी सर्व नदी खोरे पाणी कपरकर्ते पाणी वापरणारे प्रवर्ग आणि लाभारक पाण्याची संबंधित सर्व विभाग यांच्या प्रतिनिधींच्या प्रभावी समावेश आणि सहभागासह

एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करण्यात आला आहे राज्यातील प्रादेशिक असंतुल कमी करण्यासाठी व राज्याच्या विविध विभागाचा नदी धरणाचा समतोल विकास होण्यासाठी राज्यातील जलसंपत्तीचे नियोजन विकास व व्यवस्थापन याकरिता एकात्मिक राज्य जल आराखडा मार्गदर्शक ठरेल पाणी पुरवठा यांच्यातील तफावत कमी करण्यासाठी शास्वत दृष्टिकोन आणण्यासाठी एकात्मिक जल व्यवस्थापन मानवी व्यवस्थापन व पाणी वापराची कार्यक्षमता पाण्याची उपलब्ध वाढविण्यासाठीचे एकात्मिक नियोजन ब जल गुणवत्ता व्यवस्थापन जलसंवर्धन खोऱ्या अंतर्गत व अंतर खोरे स्थानांतरण पाण्याचे नियमन पाणी वापराचे व्यवस्थापन पाणलोट क्षेत्र विकास अशा गोष्टीच्या आधारे जलक्षेत्राचा शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी जलनीती एक प्रभावी भूमिका बजावू शकते.

2003 व २०१९ या जलनीतीमुळे राज्याच्या जलक्षेत्रात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम 2005 व महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्याकडून करावयाचे व्यवस्थापन अधिनियम 2005 असे कायदे अमलात आणून राज्य जलनीती मध्ये आशा कायद्याची विस्तृत मांडणी केली आहे या कायद्याची व्यापक संस्थात्मक संरचना असून या कायद्यांना व्यापक अधिकार देण्यात आले आहे .

महाराष्ट्र राज्य देशात जलसिंचनाच्या बाबतीत व जलनियमन करण्याच्या प्रक्रियेत अग्रेसर भूमिका बजावत असले तरी जल क्षेत्रात कायद्यात्मक व धोरणात्मक उणिवा आणखी ही आहेत ज्यामुळे राज्याच्या सर्व भागात सिंचनाचे प्रमाण हे विषम आहे मराठवाड्यात व विदर्भात स्वातंत्र्य पाटबंधारे विभाग असून तेथे पाण्याचे मूलभूत प्रश्न आहेत त्याचे निराकरण झालेले नाही आज जलक्षेत्रात खाजगीकरण व उदारीकरण प्रक्रियेला चालना दिली जात आहे आणि जलक्षेत्रात जे कायदे व धोरणे राबवली जात आहेत ते त्या क्षेत्राची गरज ओळखून मर्यादित धोरणे राबवले जात आहे पण बहुतांशी कायदे व धोरण हे आंतरराष्ट्रीय संस्थांच्या दबावातून राबवली गेलेली आहेत या लेखांमध्ये महाराष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर जलक्षेत्रात जी कायद्याची चौकट तयार करण्यात आली तिचे स्वरूप हे आज अनेक अर्थाने बदलले आहे सुरुवातीला कायद्यात्मक बदल हे खूप प्यापक होते पण 2005 नंतर जे धोरणात्मक बदल झालेले आहेत त्या बदलांमुळे महाराष्ट्र राज्याच्या जल क्षेत्राचे स्वरूप बदलले आहे व यासोबतच अनेक नवीन आव्हाने व शक्यता तयार झालेला आहे याचा परिणाम हा दीर्घकाळापर्यंत जल क्षेत्रावर वर होणारा आहे .

## संदर्भसूची


1. एम डब्ल्यू आर आर ए २०१० फायनल क्रायटेरिया फॉर डिटर्मिनेशन ऑफ बल्क वॉटर टेरिफ इन द स्टेट ऑफ महाराष्ट्र मुंबई एम डब्ल्यू आर आर ए
2. एम डब्ल्यू आर आर ए २०११ रिपोर्ट ऑन पब्लिक कन्सल्टेशन प्रोसेस फॉर दीटर्मिनेशन ऑफ क्राईटरिया फॉर बल्ब वॉटर टाइल्स अँड इरिगेशन ऑफ बल्क वॉटर टेरिफ प्राईज मुंबई एम डब्ल्यू आर आर ए
3. एम डब्ल्यू आर आर ए २०१५ वार्षिक अहवाल २०१४ ,१५ मुंबई एम डब्ल्यू आर आर ए
4. प्रयास २०१३ वाटर रेग्युलेटरी अथोरिटीज इन इंडिया अरे थिंकिंग द करंट मॉडेल. पुणे इंडिया
5. वर्ल्ड बँक १९९८ इंडिया वॉटर रिसोर्सेस मॅनेजमेंट सेंटर ऑन द इरिगेशन सेक्टर वाशिंग्टन डीसी द वर्ल्ड बँक